## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २१ ( ) आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शुक्रवारी योग प्रात्यक्षिके घेण्यात आली.

शुक्रवार, दि. २१ जून रोजी सकाळी ७ ते ८ या दरम्यान पदवीप्रदान सभागृहात शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासाठी योग प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर , संचालक, परीक्षा व मूल्यमापन बी.पी.पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा.पंकजकुमार नन्नवरे आणि क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मु.जे.महाविद्यालयातील सोहम डिपार्टमेंट ऑफ योगा ॲण्ड नॅचरोपॅथीच्या योग शिक्षिका प्रा.गीतांजली भंगाळे यांनी योगासनाबाबत माहिती दिली . विद्यापीठ उपअभियंता राजेश पाटील आणि श्रध्दा व्यास यांनी योगासनाचे प्रात्यक्षिके करुन दाखविले. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा.दीपक सोनवणे यांनी केले. विद्यापीठ उपअभियंता राजेश पाटील, क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. २१ ( ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत रविवार, दिनांक २३ जून, २०१९ रोजी जळगाव शहरातील ०८ केंद्रावर सेट (राज्यस्तरीय पात्रता चाचणी) परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून या परीक्षेसाठी ३३०२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

या परीक्षेसाठी खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय परिसरातील- स्वामी विवेकानंद भवन- अ (केंद्र संकेतांक क्र.१४०१) व ब (केंद्र संकेतांक क्र.१४०२), शिक्षणशास्त्र महाविद्यालय (केंद्र संकेतांक क्र.१४०३), केसीई सोसायटीचे इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च (केंद्र संकेतांक क्र.१४०४), केसीई सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय (केंद्र संकेतांक क्र.१४०५), ॲड.सिताराम (बबनभाऊ) आनंदरामजी बाहेती महाविद्यालय (केंद्र संकेतांक क्र.१४०६), पी.एन.लुंकड कन्या शाळा (केंद्र संकेतांक क्र.१४०७) व ओरियन सीबीएसई स्कुल (केंद्र संकेतांक क्र.१४०८) या ०८ केंद्रांवर सेट परीक्षा घेण्यात येणार आहे.

या परीक्षासाठीचे प्रवेशपत्र (Hall Ticket) हे setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी कुलसचिव भ.भा.पाटील यांच्याशी मो.नं. ९४२३१८५०७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २१ जून, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
(डॉ.सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी